| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**<br>**पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी,**<br>**जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९** | |

**प्रेस नोट**

**दिनांक - ३०/०६/२०२२**

**कंपनी कामगारास चाकुचा धाक दाखवुन लुटणारे चोरटे १२ तासाचे आत जेरबंद**
**महाळुंगे पोलीसांची कामगिरी : दोघांना अटक**

---

दिनांक २८/०६/२०२२ रोजी २३:४५ वा चे सुमारास कंपनी मधुन सुट्टी झाल्याने पायी चालत जाणारे श्रीनिवास चांदराव गायकवाड यांना दुचाकी वरुन आलेल्या लुटारुने चाकुचा धाक दाखवुन ५०००/रु किंमतीचा मोबाईल फोन जबरीने काढुन घेवुन पळुन गेले. पिडीत श्रीनिवास गायकवाड यांचे तक्रारी वरुन चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे पोलीस चौकी येथे **गुन्हा रजि.नंबर-१०४९/२०२२ भा.द.वि.कलम ३९२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार** यांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनानुसार पोलीस उपनिरीक्षक दिनेश चव्हाण यांनी पोलीस अंमलदार हनुमंत बांगर व अमोल वेताळ यांचेसह साध्यावेषात आरोपींचा शोध सुरु केला. वोक्सवॅगन कंपनी ते महिंद्रा कंपनी या रोडला मोटार सायकल नंबर एम एच २०/बी डब्ल्यु/३९०६ यावरील दोघेजन रस्त्याने येणारे जाणारे लोकांची संशयीतरित्या टेहाळणी करीत असल्याबाबत पोलीस अंमलदार अमोल वेताळ यांना बातमी मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक दिनेश चव्हाण व स्टाफ चौकशी करीता त्यांचेकडे जात असताना पोलीस येण्याची चाहुल लागल्याने सदरचे संशयीत महिंद्रा कंपनीचे दिशेने मोटार सायकलवरुन पळुन जावु लागले. त्यांचा पाठलाग करुन कॅपिटल सिटी सोसायटी येथे मोटार सायकल थांबविली. तेव्हा मोटार सायकलीचे पाठीमागे बसलेला संशयीत कॅपिटलसिटी सोसायटीचे पार्किंगकडे पळत जावुन लपुन बसला. त्यास स्थानिक लोकांचे मदतीने पकडुन ताब्यात घेतले. सदर दोन्ही लुटारुंना ताब्यात घेवुन दोघांकडे चौकशी करता त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना दि २९/०६/२०२२ रोजी २३:३० अटक केली आहे.

**अटक आरोपीचे नाव –**

१) **दिपक संतोष नेटके**, वय २९ वर्ष रा-बालाजीनगर, मेदनकरवाडी, ता खेड जि पुणे,
२) **सौम्यरंजन उमेश शाहो,** वय २५ वर्ष, रा-भारतमाता चौक, मोशी, ता हवेली जि पुणे

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री मंचक इप्पर,** सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्रीमती प्रेरणा कट्टे,** वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री.अरविंद पवार,** पोलीस निरीक्षक (गुन्हे) **दशरथ वाघमोडे,** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस उपनिरीक्षक **दिनेश चव्हाण,** पोलीस अंमलदार- **हनुमंत बांगर, अमोल वेताळ** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक **दिनेश चव्हाण** हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर